# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक : 06.10.2026** **वार : मंगळवार**

---

## ठळक बातम्या

1. भारत स्विझर्लंडदरम्यान वाहतूक तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा आणि गतिशीलता या क्षेत्रांसाठी 5 महत्त्वाचे करार.
2. ओडीशामध्ये कोरापुट आणि विशाखापट्टणम् इथं आज संरक्षण मंत्र्यांच्या हस्ते संरक्षण क्षेत्रातील विविध उपक्रमांचं उद्घटन आणि पायाभरणी.
3. तमिळनाडू, पुद्दुचेरी आणि पश्चिम बंगालमधल्या विधानसभेच्या पाच, तर आसाममधल्या लोकसभेच्या एका जागेच्या पोटनिवडणूकीसाठी आज मतदान.
4. मेंदूची गुपितं उलगडणाऱ्या तंत्रासाठी जर्मनी आणि अमेरिकेतील शास्त्रज्ञांना वैद्यक शास्त्रातील नोबेल पारितोषिक.

## सविस्तर बातम्या

**भारत-स्विझर्लंड बैठक**

भारत आणि स्वित्झर्लंडदरम्यान द्विपक्षीय संबंध दृढ करण्याच्या उद्देशाने काल 5 करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, स्वित्झर्लंडचे राष्ट्राध्यक्ष गाय पारमेलिन यांच्यात नवी दिल्लीत बैठक झाली. त्यानंतर संयुक्त पत्रकार परिषदेत ही माहिती देण्यात आली.

या करारांमध्ये दोनही देशांदरम्यान युवा व्यावसायिकांची देवाणघेवाण, तसेच परिवहन तंत्रज्ञान, गतिशीलता प्रणाली आणि विशिष्ट क्षेत्रांमधील पायाभूत सुविधांच्या बाबतीत सहकार्य यांसारख्या विविध क्षेत्रांचा समावेश आहे.व्यापार आणि गुंतवणूक, नवोन्मेष आणि कृत्रिम तंत्रज्ञान, संरक्षण उत्पादन आणि अणुऊर्जा यांसारख्या अनेक क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय सहकार्य अधिक दृढ करण्याच्या मुद्यांवरही या बैठकीत चर्चा झाली.'हे युद्धाचे युग नसून शांततेचे युग आहे' या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संदेशाचे स्विस राष्ट्राध्यक्षांनी कौतुक केलं.

भारताने गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये युरोपियन मुक्त व्यापार संघटनेच्या देशांशी ऐतिहासिक व्यापार आणि आर्थिक भागीदारी कराराची अंमलबजावणी केल्याची माहिती पंतप्रधान मोदी यांनी यावेळी दिली. या कराराद्वारे पुढील 15 वर्षांत 100 अब्ज अमेरिकन डॉलर्सची गुंतवणूक आकर्षित करणे आणि दहा लाख थेट रोजगार निर्माण करणे, हे भारताचे उद्दिष्ट आहे. अशी माहितीही त्यांनी दिली.

**राजनाथ सिंह**

ओडिशामधील 'हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड'च्यावतीने आयोजित कार्यक्रमाला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आज उपस्थित राहणार आहेत. कोरापुट विभागाद्वारे तयार करण्यात आलेलं नवीन तंत्रज्ञानाने सज्ज विमान इंजिन देशाला समर्पित करणार आहेत. भारताची एरोस्पेस आणि संरक्षण क्षेत्रातील उत्पादन क्षमता तसेच सशस्त्र दलांची कार्यान्वित सज्जता यामध्ये एचएएल कोरापुटचे गेल्या सहा दशकांतील योगदान या कार्यक्रमाद्वारे अधोरेखित केलं जाईल, असं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे. या कार्यक्रमात 200 कोटी रुपयांहून अधिक गुंतवणुकीसह 'शक्ती' इंजिनसाठीच्या दुसऱ्या उत्पादन वाहिनीच्या स्थापनेबाबत माहिती दिली जाईल.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आज विशाखापट्टणम इथं'हिंदुस्तान शिपयार्ड लिमिटेड'मध्ये 'फ्लीट सपोर्ट शिप-1' चे जलावतरण करतील आणि 'फ्लीट सपोर्ट शिप-5' च्या बांधणीच्या कामाचा प्रारंभ करतील. यामुळे गोदीला 45 हजार 'डेडवेट टनेज'पर्यंतची जहाजं बांधणी शक्य होईल; परिणामी, मोठ्या आणि गुंतागुंतीच्या जहाजांची निर्मिती करण्याची शिपयार्डची क्षमता वाढणार आहे

**राष्ट्रपती मुर्मू-दौरा**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून हिमाचल प्रदेशच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. राष्ट्रपती आज बिलासपूर इथल्या अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थानच्या पहिल्या दीक्षांत समारंभाला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहतील. उद्या, त्या मनालीतील हिडिंबा मंदिर आणि रोहतांग इथल्या अटल बोगद्याला भेट देतील. राष्ट्रपतींच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर बिलासपूर आणि कुल्लू जिल्ह्यांमध्ये कडेकोट सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे.

**पोट निवडणूका**

तमिळनाडू, पुद्दुचेरी आणि पश्चिम बंगालमधील पाच विधानसभा मतदारसंघांसाठी, तसंच आसाममधील एका लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणूकीसाठी आज मतदान होत आहे. पाच विधानसभा जागांमध्ये तमिळनाडूतील मदुरांतकम आणि धारापुरम, पुद्दुचेरीतील थट्टानचावडी, तसंच पश्चिम बंगालमधील रेजीनगर आणि नंदीग्राम या मतदारसंघांचा समावेश आहे. मतमोजणी शुक्रवारी होणार आहे.

भाजपने उत्तर प्रदेशातील आगामी राज्यसभा निवडणुकीसाठी 8 उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. या नावांना भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीने मंजुरी दिली आहे. या द्विवार्षिक निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस आहे.

उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि पश्चिम बंगालमधील राज्यसभेच्या जागांसाठी या महिन्याच्या 16 तारखेला मतदान होणार आहे. या निवडणुकांमध्ये उत्तर प्रदेशातील 10 आणि उत्तराखंडमधील एका जागेचा, तसेच पश्चिम बंगालमधील एका जागेसाठीच्या पोटनिवडणुकीचा समावेश असेल.

**विधान परिषद**

महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेच्या 5 जागांसाठीच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस आहे. उमेदवारी अर्जांची छाननी उद्या होईल, तर शुक्रवारपर्यंत अर्ज मागे घेता येतील. 23 ऑक्टोबर रोजी मतदान, आणि 27 ऑक्टोबर रोजी मतमोजणी होईल. या निवडणुकीदरम्यान काही जागांवर भाजपा आणि महाविकास आघाडीमधील अंतर्गत  मतभेद समोर आले आहेत.

**निवडणूक आयुक्त**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना निलंबित करण्याचा अंतरिम आदेश द्यायला सर्वोच्च न्यायालयानं काल नकार दिला. तसंच या प्रकरणी केंद्र सरकार, निवडणूक आयोग, ज्ञानेशकुमार आणि उर्वरित 2 निवडणूक आयुक्तांना सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या पीठानं नोटिसा बजावल्या. काही निर्णय मुख्य निवडणूक आयुक्तांनी एकतर्फी पद्धतीनं घेतले असं आढळून आलं तर ते निर्णय रद्द करण्याबद्दल विचार करू, असंही पीठानं स्पष्ट केलं.

याशिवाय, मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणादरम्यान वापरलेल्या 6 नंबरच्या अर्जामधल्या बदलांना मान्यता दिलेली नाही, असंही सर्वोच्च न्यायालयानं स्पष्ट केलं. या अर्जाला जोडलेलं अतिरिक्त घोषणापत्र सर्वोच्च न्यायालयानं वैध ठरवल्याचा दावा, निवडणूक आयोगानं 26 सप्टेंबर रोजीच्या प्रसिद्धीपत्रकात केला होता.

**नोबेल पुरस्कार-2026**

अमेरिकन शास्त्रज्ञ कार्ल डायसेरोथ आणि जर्मन शास्त्रज्ञ पीटर हेगेमन आणि जॉर्ज नागेल यांना मेंदूच्या अंतर्गत कार्याचा उलगडा करणारे एक महत्त्वपूर्ण तंत्र विकसित केल्याबद्दल 2026 साठीचा शरीरक्रियाविज्ञान किंवा वैद्यकशास्त्रातील नोबेल पुरस्कार मिळाला आहे. ऑप्टोजेनेटिक्स म्हणून ओळखली जाणारी ही पद्धत एका प्रकाश-संवेदनशील स्विचप्रमाणे कार्य करते, ज्यामुळे शास्त्रज्ञांना मेंदूतील कोणत्या पेशी कोणत्या कार्यासाठी जबाबदार आहेत याचा नकाशा तयार करणे शक्य होते.

**पियुष गोयल**

केंद्रिय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी काल न्यूयॉर्कमध्ये अमेरिकेतील आघाडीच्या व्यावसायिकांची भेट घेतली. अमेरिकेतील उद्योगांनी भारतात गुंतवणूक करावी असं आवाहन गोयल यांनी यावेळी केलं. ब्लॅकस्टोनचे अध्यक्ष जोनाथन ग्रे, न्यूबर्गर बर्मनचे अध्यक्ष

आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जॉर्ज वॉकर आणि एस्टी लॉडर कंपन्यांचे अध्यक्ष आणि सीईओ, स्टीफन डी ला फावेरी यांची भेट घेतली. G-20 व्यापार मंत्र्यांच्या बैठकीत सहभागी होण्यासाठी गोयल अमेरिकेच्या दौऱ्यावर होते.

**न्यायधीश नियुक्ती**

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून 3 उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायाधीशांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ही नियुक्ती केली असल्याचं कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी समाजमाध्यमावरील संदेशात सांगितलं. गुजरात उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती सुनीता अग्रवाल, दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि तेलंगणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती अपारेश कुमार सिंह यांची सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती केली आहे.

**पाणी कपात**

महाराष्ट्रात सर्वत्र येत्या 16 ऑक्टोबरपासून किमान दहा टक्के पाणीकपात लागू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत अशी माहिती जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी दिली. राज्यात यंदा अल निनोच्या प्रभावामुळं पर्जन्यमानात मोठी घट झाली असून, अनेकभागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे पुढच्या वर्षीच्या 31 ऑगस्टपर्यंत पाणी पुरेल या हिशेबानं आवश्यकतेनुसार कपात वाढवावी, असं सरकारनं स्पष्ट केलं.

**आदिती तटकरे**

महाराष्ट्रातील दुष्काळ-निवारण उपाययोजना केवळ अधिकृतपणे घोषित केलेल्या 265 दुष्काळग्रस्त तालुक्यांपुरत्या मर्यादित न ठेवता, राज्यातील सर्व 358 तालुक्यांमध्ये त्या राबवण्याचे नियोजन करावे. अशा सूचना राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी काल जिल्हा आणि तालुका प्रशासनाला दिल्या. या उपाययोजनांमध्ये अंगणवाडी केंद्रांवर अन्न आणि पाणी पुरवठा सुनिश्चित करणे, स्थलांतरित कुटुंबांमधील मुलांसाठी सुरक्षित निवाऱ्याची व्यवस्था करणं आणि बालविवाह रोखणे यांचा समावेश असेल.

**एम.पी.एस.सी.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी आणि विद्यमान अध्यक्ष आणि सदस्य यांच्या चौकशीसाठी समिती स्थापन करण्याची शिफारस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्याकडे केली आहे. या शिफारशीनुसार, समितीचे नेतृत्व उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश करतील आणि समिती आपला अहवाल 3 महिन्यांच्या आत सादर करेल. समितीच्या निष्कर्षांवर आधारित पुढील कार्यवाही केली जावी, असा प्रस्ताव मुख्यमंत्र्यांनी मांडला आहे.

**क्रिकेट**

पुरुषांच्या क्रिकेटमध्ये भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातला पाच सामन्यांच्या मालिकेतला पहिला टी-20 सामना आज खेळला जाणार आहे. लखनौ इथल्या 'भारतरत्न श्री अटल बिहारी वाजपेयी एकाना क्रिकेट स्टेडियम'वर संध्याकाळी 7 वाजता सामना सुरू होईल.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**